**<u>ठळक बातम्या</u>**

- आरोग्याशी संबंधित १२ हजार ८५० रुपये कोटी खर्चाच्या विविध विकास कामांचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन आणि भूमिपूजन

- भारत-स्पेन मैत्री वृद्धिंगत करण्यावर उभय राष्ट्रांचा भर राहील, अशी स्पेनचे प्रधानमंत्री पेद्रो सांचेझ यांची मुंबईतल्या कार्यक्रमात ग्वाही

- महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांकडून अर्ज दाखल /अखेरच्या दिवशीही उमेदवार याद्या जाहीर

- ज्येष्ठ साहित्यिक डॉ. वीणा देव यांचं निधन

**आणि**

- राजस्थानात खाजगी प्रवासी बसला झालेल्या अपघातात १२ जणांचा मृत्यू, २५ जखमी

**<><><><><>**

देशातले नागरिक निरोगी असतील तर देशाच्या प्रगतीला गती मिळते, त्यामुळेच देशात आरोग्य विषयक पायाभूत सुविधांचा विस्तार करायला आपल्याला सरकारनं प्राधान्य दिलं आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. धन्वंतरी जयंती आणि नवव्या आयुर्वेद दिनानिमित्त प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नवी दिल्ली इथं झालेल्या कार्यक्रमात आरोग्य क्षेत्राशी संबंधित सुमारे १२ हजार ८५० कोटी रुपयांच्या अनेक प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी आज झाली, त्यावेळी

ते बोलत होते. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवा, निदान सुविधा, परवडणारी औषधं आणि उपचार, छोटी शहरं आणि खेड्यांमधे पुरेशा आणि योग्य आरोग्यविषयक सेवा तसंच आरोग्य क्षेत्रात तंत्रज्ञानाचा विस्तार असे पाच प्रमुख स्तंभ आखून आपलं सरकार काम करत असल्याचं त्यांनी सांगितलं.

विज्ञाननिष्ठ सर्वंकष संशोधनाच्या माध्यमातून पारंपरिक औषधी वनस्पतींची उपयोगिता प्रमाणित करता येईल असं ते म्हणाले. आयुषच्या यशामुळे आरोग्य क्षेत्रासोबत अर्थव्यवस्थेतही बदल होत आहेत, गेल्या दहा वर्षांत आयुष उत्पादन क्षेत्र तीन अब्ज डॉलरवरून २४ अब्ज डॉलरपर्यंत वाढलं आहे असं त्यांनी सांगितलं. सध्या देशात ९०० आयुष स्टार्ट अप कार्यरत असून, त्यामुळे तरुणांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण झाल्या असल्याचं ते म्हणाले.

या कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत ७० आणि त्यापेक्षा जास्त वर्ष वय असलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या आरोग्य विम्याच्या विस्ताराचा प्रारंभ केला. देशातलं पहिल्या अखिल भारतीय आयुर्वेद संस्थेच्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटन त्यांनी केलं. मध्य प्रदेशातील तीन वैद्यकीय महाविद्यालयांचं उद्घाटन आणि पाच परिचारिका महाविद्यालयांची पायाभरणी,  तसंच हिमाचल प्रदेश, पश्चिम बंगाल, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आसाम आणि नवी दिल्ली इथल्या एम्स रुग्णालयांतल्या सुविधा आणि सेवांच्या विस्ताराचं उद्घाटनही त्यांच्या हस्ते झालं.

**<><><><><>**

भारत-स्पेन दरम्यान दृढ मैत्री संबंध असून ते वृद्धिंगत करण्यावर उभय राष्ट्रांचा भर राहील असं स्पेनचे प्रधानमंत्री पेद्रो सांचेझ यांनी म्हटलं आहे. मुंबईत चौथ्या स्पेन- भारत मंचाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. शाश्वत भविष्याच्या

दृष्टीनं या दोन्ही देशांचं सहकार्य सकारात्मक पुढाकार ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सध्याच्या वाढत्या भूराजकीय तणावाच्या काळात मानवी हक्कांचं आणि नागरिकांचं संरक्षण या बाबींवर लक्ष दिलं पाहिजे असं ते म्हणाले. व्यापार, गुंतवणूक त्याचप्रमाणे डिजिटल तंत्रज्ञान आणि त्यानं निर्माण झालेली आव्हानं या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय स्तरावर सहकार्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. या मंचाची संकल्पना "सध्याच्या भूराजकीय आणि तंत्रज्ञान विषयक आव्हानांसंदर्भात स्पेन – भारत भागीदारी : नवी क्षितिजं, नवीन शक्यता" अशी आहे.

**<><><><><>**

संरक्षण क्षेत्रात स्वावलंबनाला चालना देऊन संरक्षण  सामुग्रीची आयात कमी करण्याचा सरकारचा प्रयत्न  असल्याचा पुनरुच्चार सरंक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी केला. भारतीय नौदलाच्या नवोन्मेष आणि स्वदेशीकरण परिसंवाद, स्वावलंबन २०२४ या कार्यक्रमात ते आज बोलत होते. संरक्षण क्षेत्रात खासगी आणि सार्वजनिक अशा दोन्ही क्षेत्रांचं समसमान योगदान असायला हवं असं संरक्षणमंत्र्यांनी अधोरेखित केलं. सशक्त संरक्षण औद्योगिक परिसंस्था उभारण्यासाठी सरकारने खासगी क्षेत्राला अनेक सवलती दिल्या आहेत, असंही राजनाथ सिंह यांनी सांगितलं.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस जयशंकर यांनी आज नवी दिल्लीत संरक्षण दल अधिकाऱ्यांच्या परिषदेला संबोधित केलं. सध्याच्या भूराजकीय परिस्थितीमुळे निर्माण झालेली आव्हानं, नवनवीन शक्यता आणि संधी या विषयांवर त्यांनी विवेचन केलं. राष्ट्रीय सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य हाच सरकारचा दृष्टीकोन असल्याचं त्यांनी स्पष्ट केलं.

<><><><><>

देशभरात आज दिवाळीचा दुसरा दिवस म्हणजेच धनत्रयोदशी साजरी होत आहे. आजच्या दिवशी धनाची आणि धानाची तसंच देवांचे वैद्य असलेल्या धन्वंतरींची पूजा आज केली जाते. धणे आणि गूळ यांचा नैवेद्य दाखवला जातो. या निमित्तानं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या आहेत. आज साजऱ्या होणाऱ्या आयुर्वेद दिनानिमित्तही प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात शुभेच्छा दिल्या आहेत. निरोगी जीवनशैलीसाठी आयुर्वेद उपयुक्त ठरतो. भगवान धन्वतरींची जयंती ही आयुर्वेदाच्या उपयुक्ततेशी आणि योगदानाशी निगडित असल्याचं प्रधानमंत्री आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणाले आहेत.

<><><><><>

महाराष्ट्रात, विधानसभा निवडणुकीसाठी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी विविध राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी आपापले अर्ज दाखल केले. भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज शक्तिप्रदर्शन करत कामठी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला. कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी साकोलीतून अर्ज भरला.

शिवसेनेचे दीपक केसरकर आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे राजन तेली यांनी सावंतवाडी मतदारसंघातून, तर शिवसेनेचे मिलिंद देवरा यांनी वरळी मतदारसंघातून अर्ज दाखल केला.

नागपूर उत्तर मतदारसंघातून कॉंग्रेसचे ज्येष्ठ नेते नितीन राऊत यांनी, बेलापूरमधून भाजपाच्या मंदा म्हात्रे, दिंडोशीतून संजय निरुपम, रत्नागिरी मतदारसंघातून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बाळ माने, महाड मधून भरत गोगावले आणि उमेदवारी अर्ज दाखल केला.

<><><><><>

भारतीय जनता पक्षानं आज जाहीर केलेल्या यादीनुसार उमरेडमधून सुधीर पारवे, तर मीरा भाईंदरमधून नरेंद्र मेहता यांना उमेदवारी दिली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षानं माढा विधानसभा मतदारसंघातून अभिजित पाटील, मुलुंडमधून संगीता वाजे, मोर्शी मधून गिरीश कराळे, पंढरपूरमधून अनिल सावंत, मोहोळमधून राजू खरे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं भाजपमधून आलेल्या तृप्ती सावंत यांना वांद्रे पूर्व मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवलं आहे.

दुसरीकडे उमेदवारीसाठी इच्छुक पण संबंधित राजकीय पक्षाकडून तिकिट न मिळालेले काही उमेदवार नाराजी व्यक्त करताना दिसत आहेत. **पालघरमधे** निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक श्रीनिवास वनगा यांनी माध्यमांसमोर नाराजी व्यक्त केली. काल संध्याकाळपासून ते बेपत्ता झाले असल्याचं आमच्या पालघरच्या वार्ताहरानं कळवलं आहे. पोलीस वनगा यांचा शोध घेत आहेत. दरम्यान, भाजपाचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी बोरीवलीतून, माजी आमदार अतुल शहा यांनी मुंबादेवी तर घाटकोपर पूर्वमधून भाजपाच्याच प्रकाश मेहता यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातले उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत आज संपली. अर्जांची छाननी उद्या होणार असून येत्या शुक्रवारी १ नोव्हेंबरपर्यंत माघार घेता येईल. या टप्प्यात ३८ मतदारसंघांमधे येत्या २० नोव्हेंबरला मतदान होणार आहे. पहिल्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांच्या छाननीत ६२ अर्ज बाद झाले असून ४३ मतदारसंघांमधे मिळून ७४३ अर्ज वैध ठरले आहेत.

या टप्प्यासाठी उमेदवारी मागं घेण्याची मुदत उद्या संपणार आहे. या टप्प्यात येत्या १३ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.

**<><><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात उद्या **जालना आणि बीड** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><><>**

ज्येष्ठ साहित्यिक प्राध्यापक डॉक्टर वीणा देव यांचं आज पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. त्या ७५ वर्षांच्या होत्या. गेले काही दिवस  त्या आजारी होत्या. वीणा देव या दिवंगत इतिहास अभ्यासक आणि लेखक गो. नी. दांडेकर यांच्या कन्या तर अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या मातोश्री होत. त्यांच्या पार्थिवावर आज रात्री ९ च्या सुमारास पुण्याच्या वैकुंठ स्मशानभूमीमध्ये अंत्य संस्कार करण्यात येणार असल्याचं त्यांच्या निकटवर्तियांनी सांगितलं.

'कधीकधी', 'परतोनी पाहे', 'स्त्रीरंग', 'विभ्रम', 'स्वान्सीचे दिवस' ही त्यांची पुस्तकं प्रसिद्ध आहेत. त्यांनी गो. नी.दांडेकर यांच्यावर लिहिलेल्या 'आशक मस्त फकीर' या पुस्तकाला राज्य शासनाचा उत्कृष्ट ललित साहित्य निर्मितीचा पुरस्कार मिळाला. राज्य शासनाच्या मराठी राजभाषा सल्लागार समितीवर सदस्य म्हणून त्यांनी काम केलं. त्यांना मोरया गोसावी जीवनगौरव पुरस्कार तसेच साईरंग प्रतिष्ठानतर्फे कर्तृत्वगौरव पुरस्कार देण्यात आला.

<><><><><>

भारताचे लोहपुरुष आणि आणि भारताच्या एकतेचे प्रमुख शिल्पकार म्हणून ओळखले जाणारे म्हणून ओळखले जाणारे सरदार पटेल यांची १५० वी जयंती श्रीलंकेत कोलंबो इथंही साजरी केली गेली. यानिमित्तानं कोलंबोतल्या लिओनेल वेंडट आर्ट सेंटर इथं सरदार वल्लभभाई पटेल यांचे जीवन आणि वारसा सांगणारं छायाचित्र प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. श्रीलंकेतले भारताचे उच्चायुक्त संतोष झा यांच्या हस्ते या प्रदर्शनाचं आज उद्घाटन झालं. या प्रदर्शनात सरदार पटेल यांचा जीवनप्रवास मांडला आहे. हे प्रदर्शन उद्या संध्या ७ वाजेपर्यंत खुलं असणार आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे अहमदाबाद सुरु असलेल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडनं भारतापुढे विजयासाठी २३३ धावांचं आव्हान ठेवलं आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडचा सामन्यातला एक चेंडू बाकी असताना २३२ धावांवर आटोपला. ब्रुक हॅलिडेच्या ८६ धावांमुळे त्यांच्या धावसंख्येला आकार मिळाला. भारतातर्फे दीप्ती शर्मानं ३, प्रिया मिश्रानं २, तर सायमा ठाकूर आणि रेणुका सिंग यांनी प्रत्येकी १ बळी मिळवला.

स्मृती मंधना आणि हरमनप्रीत कौर यांच्या शतकी भागिदीरीमुळे भारताची स्थिती मजबूत झाली आहे. शेवटची बातमी हाती आली तेव्हां, भारताच्या  ३९ षटकात  २ बाद  २०३ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//